NO:GAD/I-B/HRA-8/16818
Maharashtra State Electricity Board
Prakashgad, Anant Kanekar Marg,
Bandra (East), Mumbai – 400 051.
Date:- 23rd April, 2001.

# :CIRCULAR:

SUB: Grant of House Rent Allowance to the employee drawing higher basic pay than any other member / members of the family of the Board's employee/other employee living in the same private accommodation.

.................................

As per the powers delegated vide Board's Resolution No.601 dated 28.5.1987, the Chairman in consultation with the Secretary, the Technical Member and the Accounts Member, has accorded the approval to adopt Government Resolution No.घभाभ-1001/CR-8/SER-5 dated 31.1.2001 as under:

If in a family living in the same private accommodation -

(a) One or more members are Board's employees OR

(b) One or more members are other employees OR

(c) One or more members are Board's employees and one or more members are other employees,

then in all the above mentioned types of cases, the House Rent Allowance shall be admissible only to the employees who draws basic pay higher than that of any other member of that family.

**Note (1):** For the purpose of these orders, "**Family**" means wife/husband, as the case may be, legitimate children, step children, mother and father of the Board/other employee.

(An adopted child shall be considered to be a legitimate child if, under the personal law applicable to the Board/other employee, adoption is legally recognised as conferring on it the status of a natural child).

**Note (2):** For the purpose of these orders the term "Other employees" shall include.

(a) all employees of State Government of Maharashtra whom Government House Rent is applicable.

(b) full-time teaching and non-teaching staff of Primary and Secondary School of aided educational institutions,

(c) teaching and non-teaching staff of Agricultural and Non-Agricultural Universities and affiliated colleges,

(d) other employees mentioned in paragraph 6 of Government Resolution, Finance Department, No.भवभ-1186/394/SER-10 dated 18th August, 1986 (if the presen, scheme of House Rent Allowance is applicable to them), appended hereto.

(e) employees of Zilla Parishads,

(f) employees of Municipalities and Nagar Parishads to whom the House Rent Allowance scheme is applicable with Government grants,

(g) teaching and non-teaching staff drawing pay in the U.G.C. scales of pay and

(h) all other employees to whom Government House Rent Allowance scheme is made applicable.

2. While preferring the claim for House Rent Allowance, the Board employee/other employee drawing the higher basic pay in the family shall submit to his/her office, a certificate in Form "A" as also a certificate in Form "B" issued by the offices in which all other Board employees/other employees included in the family are employed. If the family includes only the Board employee/other employee, he/she shall submit the certificate in Form "C". Forms of these certificates are enclosed in the Annexure in Marathi.

3. While preferring his/her claim for House Rent Allowance for the next Financial Year, an employee shall submit the certificate/s appropriate as above in the month of March each year or whenever there is a change in the circumstances certified earlier. An employee shall also submit such certificates at the time of his/her first appointment.

4. The Drawing & Disbursing Officer shall take into consideration the claim for House Rent Allowance of an employee only after the submission of appropriate certificate/s mentioned in paragraph 2 above.

5. All other conditions at present applicable for grant of House Rent Allowance shall continue to apply.

6. These orders have been made applicable with effect from 1st February, 2001.

7. Since these orders have been made applicable retrospectively, an employee shall submit appropriate certificate/s by 15th May,2001 for the months of February and March, 2001 and for the financial year 2001-2002, separately, to enable the Drawing & Disbursing Officer to take into consideration their claim for H.R.A.. The Drawing & Disbursing Officer shall make recovery of excess paid H.R.A during the moths of February, March and April, 2001, if any.

Secretary

No.EE/SUR/U/GAD/ No 4 2 8 5 - Date : 14 MAY 2001

Copy to -

1) The Dy.Ex.Engineer (U)/(E)/(DVC) Solapur.
2) The Assistant Engineer, A/B/C/D Solapur.
3) The Dnl.Acctt. (E/R) Urban Solapur.
4) The Estt.Supdt. Urban Solapur.
5) The Head Clerk, Urban Solapur.
6) The P.B.Clerk- Shri Ruge/Shri Patil/ Shri Gavali/Shri Manvi/Shri Asangi/ Shri Waghmode/Miss Hedgire.

Executive Engineer (U)

-८०-

**एकाच खाजगी निवासस्थानात राहणा-या शासकीय व इतर कर्मचा-यांच्या कुटुंबातील जो कर्मचारी सर्वात जास्त मूळ वेतन घेत असेल फक्त अशाच कर्मचा-यास घरभाडे भत्ता अनुज्ञेय करण्याबाबत--**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक घभाभ - १००१/प्र.क्र.८/सेवा-५**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक: ३१ जानेवारी २००१**

**पहा:** (१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक सीपीए १४५७/एस-६, दिनांक १५ एप्रिल १९५९

(२)शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक सीपीए १४६९/४२५-अठरा,दिनांक २९ मे १९७०

(३)शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक मभवा-११८६/३९४/सेवा-१०,दिनांक १८ ऑगस्ट १९८६

(४)शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२८७/६४३/सेवा-१०, दिनांक २५ एप्रिल १९८८

## शासन निर्णय

एकाच खाजगी निवासस्थानात राहणा-या शासकीय व इतर कर्मचा-यांच्या कुटुंबातील जो कर्मचारी सर्वात जास्त मूळ वेतन घेत असेल फक्त अशाच कर्मचा-यास घरभाडे भत्ता अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या सर्व आदेशांतील याबाबतच्या तरतूदी अधिक्रमित करुन शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :

१. जर एकाच खाजगी निवासस्थानात राहणा-या कुटुंबातील -

(अ) एक वा त्यापेक्षा अधिक सदस्य शासकीय कर्मचारी असतील **किंवा**

(ब) एक वा त्यापेक्षा अधिक सदस्य हे इतर कर्मचारी असतील **किंवा**

(क) एक वा त्यापेक्षा अधिक सदस्य शासकीय कर्मचारी आणि एक वा त्यापेक्षा अधिक



जिल्हाधिकारी ... कार्यालय ...
27 MAR 2001

सदस्य इतर कर्मचारी असतील,

तर वरील सर्व प्रकरणी ज्या कर्मचा-याचे मूळ वेतन कुटुंबातील उर्वरित सदस्यांपेक्षा जास्त असेल केवळ त्यालाच घरभाडेभत्ता अनुज्ञेय असेल.

टीप (१): या आदेशाच्या प्रयोजनासाठी "**कुटुंब**" म्हणजे शासकीय कर्मचारी/इतर कर्मचारी आणि यथास्थिती त्याची पत्नी/तिचा पती, औरस मुले, सावत्र मुले, आई आणि वडील.

*(जर शासकीय कर्मचा-याच्या/इतर कर्मचा-याच्या व्यक्तिगत कायद्याप्रमाणे, दत्तक मुलाला नैसर्गिक मुलाचा दर्जा देणा-या दत्तविधानास कायदेशीर मान्यता मिळालेली असेल तर ते दत्तक मूल औरस मूल म्हणून समजण्यात येईल.)*

टीप (२): या आदेशाच्या प्रयोजनासाठी "**इतर कर्मचारी**" या संज्ञेत

अ) सर्व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांतील पूर्णकालीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,

ब) कृषि व कृषितर विद्यापीठातील व तत्संलग्न महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,

क) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक मभवा- ११८६/३९४/सेवा-१०, दिनांक १८ ऑगस्ट १९८६ मधील परिच्छेद ६ मध्ये उल्लेखिलेले इतर कर्मचारी (त्यांना सध्याची घरभाडेभत्त्याची योजना लागू असल्यास),

ड) जिल्हा परिषदांचे कर्मचारी,

इ) शासकीय अनुदानाच्या सहाय्याने घरभाडे भत्त्याची योजना लागू असलेले महानगरपालिका व नगर परिषदांमधील कर्मचारी,

फ) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनानुसार वेतन घेणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि

ग) राज्य शासनाची घरभाडे भत्त्याची योजना लागू असलेले उर्वरित सर्व कर्मचारी समाविष्ट असतील.

२. घरभाडे भत्त्याची मागणी करतांना, कुटुंबात सर्वाधिक मूळ वेतन घेणारा शासकीय कर्मचारी/इतर कर्मचारी त्याच्या/तिच्या कार्यालयास नमुना - अ मधील प्रमाणपत्र तसेच कुटुंबात समाविष्ट होणा-या इतर सर्व शासकीय कर्मचा-यांना/इतर कर्मचा-यांना ते काम करीत असलेल्या कार्यालयांनी दिलेली नमुना - ब मधील प्रमाणपत्रे सादर करील. कुटुंबात केवळ एकच शासकीय

कर्मचारी/इतर कर्मचारी समाविष्ट असेल तर तो/ती नमुना - क मधील प्रमाणपत्र सादर करील. प्रमाणपत्राचे नमुने या शासन निर्णयासोबतच्या जोडपत्रात दिले आहेत.

वरीलप्रमाणे समुचित प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे पुढील आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी घरभाडे भत्याची मागणी करणा-या कर्मचा-याने प्रत्येक वर्षाच्या फेब्रूवारी महिन्यात आणि ज्या ज्या वेळी प्रमाणपत्रान्वये पूर्वी प्रमाणित केलेल्या वस्तुस्थितीत बदल होत असेल त्या त्या वेळी सादर करावीत. तसेच, कर्मचा-याने त्याच्या प्रथम नियुक्तीच्या वेळेसही अशी प्रमाणपत्रे सादर करावीत.

३. वरील परिच्छेद-२ मध्ये नमूद केलेली समुचित प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे घरभाडे भत्याची मागणी करणा-या कर्मचा-याकडून सादर करण्यात आल्यानंतरच कार्यालय प्रमुख याबाबतची मागणी विचारात घेईल.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की जिल्हा परिषदांच्या कर्मचा-यांनाही हे आदेश लागू राहतील.

५. घरभाडे भत्ता देण्यासंबंधीच्या सध्याच्या इतर सर्व शर्ती तशाच लागू राहतील.

६. हे आदेश दिनांक ०१ फेब्रूवारी २००१ पासून अंमलात येतील.

७. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श. वि. लागवणकर**
**शासनाचे सह सचिव**

प्रति -

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र,मुंबई
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र,नागपूर.
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा),महाराष्ट्र,मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र,नागपूर
अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
*प्रबंधक,उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
*सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
*सहसंचालक, ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ-गव्हर्नमेंट, मुंबई.
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
नगर विकास विभाग, यूडी-१०,मंत्रालय,मुंबई (२० प्रती)
कृषि व पदुम विभाग (२० प्रती)
आदिवासी विकास विभाग (२० प्रती)
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग),खोली क्र २६१,नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई.
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब,मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी,जिल्हा अहमदनगर.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (४० प्रती)

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (१०० प्रती)
संचालक, तांत्रिक प्रशिक्षण, द्वारा- तंत्र शिक्षण संचालक, मुंबई ( २५० प्रती)
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व जिल्हा परिषदाचे शिक्षणाधिकारी
आयुक्त, महानगरपालिका, नागपूर
प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका शिक्षण मंडळे (पुणे/कोल्हापूर/सोलापूर या महानगरपालिकांची शिक्षण मंडळे यासह)
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका.
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक (१० प्रती)
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
संचालक, आदिवासी संशोधन व शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आदिवासी विकास आयुक्त, नाशिक
सर्व विभागीय समाज कल्याणअधिकारी.
अपर आयुक्त, आदिवासी उपयोजना, नाशिक/नागपूर
सर्व समाज कल्याणअधिकारी, वर्ग-१
सर्व आदिवासी कल्याण अधिकारी
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प.
कुलसचिव सर्व कृषि विद्यापीठे
कुलसचिव सर्व अकृषि विद्यापीठे
अधिक्षक, वेतन पथक,सर्व जिल्हे
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर,दक्षिण व पश्चिम विभाग)
सर्व कन्या शाळा निरीक्षिका.
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग)
शिक्षणअधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालेका.
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
सर्व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन.
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग-सेवा-५.

*पत्राने

**शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक घभाभ-१००१/प्र.क्र.८/सेवा-५, दिनांक ३१ जानेवारी २००१ चे सहपत्र**

**जोडपत्र**

घरभाडे भत्याची मागणी करतांना, प्रथम नियुक्तीच्या वेळेस व त्यानंतर प्रत्येक वर्षी फेब्रुवारी महिन्यामध्ये आणि ज्या ज्या वेळी या प्रमाणपत्रान्वये पूर्वी प्रमाणित केलेल्या वस्तुस्थितीत बदल होत असेल तेव्हा खाजगी निवासस्थानात राहणा-या * शासकीय / इतर कर्मचा-याने सादर करावयाच्या प्रमाणपत्रांचे नमुने :

**नमुना -अ**

(*शासकीय/इतर कर्मचा-यासोबत त्याच्या कुटुंबात समाविष्ट असणारा/असणारे शासकीय आणि/किंवा इतर कर्मचारी रहात असल्यास द्यावयाचे प्रमाणपत्र)

मी, श्री./श्रीमती________________________________ (पदनाम) ____________

______________(कार्यालय)________________________#_(पत्ता)____________________

________________________________________________________________

असे प्रमाणित *करतो/करते की सन २०---- - २०--- या आर्थिक वर्षात माझ्यासोबत *राहणारा/राहणारी आणि शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक घभाभ-१००१/प्र.क्र.८/सेवा-५, दिनांक ३१ जानेवारी २००१ च्या आदेशान्वये " इतर कर्मचारी " या संज्ञेत समाविष्ट असलेला कोणताही सदस्य किंवा शासकीय कर्मचारी असलेला माझ्या कुटुंबाचा सदस्य * तो/ती नोकरी करीत असलेल्या कार्यालयात घरभाडेभत्याची मागणी करणार नाही.

दिनांक

कर्मचा-याची सही

------------------------------------------------------------------------------------------

कृ.मा.पहा

## नमुना - ब

(* शासकीय/इतर कर्मचा-यासोबत राहणा-या आणि त्याच्या कुटुंबात समाविष्ट असणा-या उर्वरित सर्व शासकीय आणि इतर कर्मचा-यांच्या कार्यालयांनी अशा प्रत्येक सदस्यासाठी स्वतंत्रपणे द्यावयाचे प्रमाणपत्र)

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ______________________ (पदनाम) ______________________(कार्यालय)______________________#(पत्ता)__________ ______________________ यांनी सन २०------ - २०------ या आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी घरभाडेभत्त्याची मागणी केलेली नसल्यामुळे त्यांना या कालावधीसाठी घरभाडेभत्ता दिला जाणार नाही.

( कार्यालय प्रमुखाची सही )
नाव व पदनाम
कार्यालय/विभाग

---

## नमुना - क

(* शासकीय / इतर कर्मचा-याने, त्याच्या सोबत अन्य शासकीय किंवा इतर कर्मचारी असलेला त्याच्या कुटुंबाचा सदस्य रहात नसल्यास द्यावयाचे प्रमाणपत्र)

मी श्री./श्रीमती ______________________ (पदनाम) ______________

(कार्यालय) ______________________ असे प्रमाणित * करतो /करते की,

(अ) माझ्या सोबत राहणा-या आणि माझ्या कुटुंबाचा सदस्य असलेल्या व्यक्तींमध्ये कोणताही कर्मचारी, शासकीय कर्मचारी किंवा शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक घभाभ-१००१/प्र.क्र.८/सेवा-५, दिनांक ३१ जानेवारी २००१ च्या आदेशात नमूद "इतर कर्मचारी " या संज्ञेत समाविष्ट असलेला कर्मचारी नाही.

(ब) माझ्या सोबत कुटुंबाचा सदस्य असलेला कोणताही शासकीय कर्मचारी किंवा शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक घभाभ-१००१/प्र.क्र.८/सेवा-५, दिनांक ३१ जानेवारी २००१ च्या आदेशान्वये "इतर कर्मचारी " या संज्ञेत समाविष्ट असलेला कर्मचारी रहात नाही.

दिनांक

कर्मचा-याची सही

---

* नको असलेला मजकूर खोडावा.

# येथे संपूर्ण पत्ता नमूद करावा.

**Grant of House Rent Allowance to the employee drawing basic pay higher than any other member/s of the family of Government and other employees living in the same private accommodation ------**

**Government of Maharashtra**
**Finance Department**
**Government Resolution No.घभाभ-1001/CR 8/SER-5**
**Mantralaya, Mumbai 400 032**
**Date: 31 January 2001**

**Read:-** (1) **Government Resolution, Finance Department, No.CPA 1457/S-6, date 15 April 1959**
(2) **Government Resolution, Finance Department, No.CPA 1469/425-Eighteen, date 29 May 1970**
(3) **Government Resolution, Finance Department, No. मभवा-1186/394/SER-10, date 18 August 1986**
(4) **Government Resolution, Finance Department, No. RPS 1287/643/SER-10, date 25 April 1988**

## Government Resolution

The question of grant of House Rent Allowance to the employee drawing higher basic pay than any other member of the family of a Government employee/ other employee living in the same private accommodation was under consideration of the Government. In supersession of all the provisions contained in the orders issued in this regard, Government is now pleased to direct as under :

1. If in a family living in the same private accommodation --

(a) one or more members are Government employees **or**
(b) one or more members are other employees **or**
(c) one or more members are Government employees and one or more members are other employees,

then in all the above- mentioned types of cases, House Rent Allowance shall be admissible only to the employee who draws basic pay higher than that of any other member of the family.

Note (1): For the purpose of these orders, "**Family**" means wife/husband, as the case may be, legitimate children, step children, mother and father of the Government/other employee.
(An adopted child shall be considered to be a legitimate child if, under the personal law applicable to the Government/other employee, adoption is legally recognised as conferring on it the status of a natural child).

Note (2): For the purpose of these orders the term "**Other employees**" shall include

(a) full-time teaching and non-teaching staff of Primary and Secondary Schools of aided educational institutions,
(b) teaching and non-teaching staff of Agricultural and Non-Agricultural Universities and affiliated colleges,
(c) other employees mentioned in paragraph 6 of Government Resolution, Finance Department, No.मभवा-1186/394/ SER-10,date 18 August 1986 ( if the present scheme of House Rent Allowance is applicable to them),
(d) employees of Zilla Parishads,
(e) employees of Municipalities and Nagar Parishads to whom the House Rent Allowance scheme is applicable with Government grants,
(f) teaching and non-teaching staff drawing pay in the U.G.C.scales of pay and
(g) all other employees to whom Government House Rent Allowance scheme is made applicable.

2. While preferring claim for House Rent Allowance, the Government employee/other employee drawing the highest basic pay in the family shall submit to his/her office, a certificate in form A as also a certificate in form B issued by the offices in which all other Government employees/other employees

included in the family are employeed. If the family includes only the Government employee/other employee, he/she shall submit the certificate in form C. Forms of these certificates are enclosed in the annexure to the Marathi version of this resolution.

While preferring his/her claim for House Rent Allowance for the next financial year, an employee shall submit certificate/s appropriate as above in the month of February each year or whenever there is a change in the circumstances certified earlier. An employee shall also submit such certificates at the time of his/her first appointment.

3. The Head of Office shall take into consideration the claim for House Rent Allowance of an employee only after the submission of appropriate certificate/s mentioned in paragraph 2 above.

4. In exercise of the powers conferred under the proviso to section 248 of the Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samitis Act, 1961 (Mah.V of 1962) and all other powers enabling it in that behalf, Government is also pleased to direct that these orders should also be made applicable *mutatis mutandis* to the Zilla Parishad employees.

5. All other conditions at present applicable to the grant of House Rent Allowance shall continue to apply.

6. These orders shall come into effect from 01 February 2001.

By order and in the name of Governor of Maharashtra,

S. V. Lagwankar
Joint Secretary to Government

* * * * *